# थोडक्यात

### विशेषांक प्रकाशन सोहळा

**मुंबई :** हिंदी विवेकच्या पाचव्या स्थापना दिवसानिमित्त हिंदी विवेक आणि श्री भागवत परिवार यांच्यावतीने राष्ट्र पुरुष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकाचा लोकार्पण सोहळा सोमवार ६ एप्रिल रोजी सायंकाळी ६.१५ वाजता स्वा. सावरकर स्मारक, शिवाजी पार्क, दादर (प.) आयोजित करण्यात आला आहे. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातच्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल, रा.स्व. संघाचे सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

### वरळी कोळीवाडा येथे हनुमान जयंती उत्सव

**मुंबई :** सालाबादप्रमाणे यंदाही वरळी (कोळीवाडा) येथील हनुमान मंदिरात २८ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत हनुमान जयंती साजरी होणार आहे. यामध्ये हरिनाम सप्ताह, हरिकथा, कीर्तने, प्रवचने, नामवंत भजनी मंडळांचे भजने, आदी कार्यक्रम होणार आहेत. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिरातील पुजारी सचिन मुळये यांनी केले आहे.

### आदरांजली सभा

**मुंबई :** रिपाइंचे दक्षिण मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष सिध्दार्थ कासारे यांचे वडील आणि आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते देवराम कासारे यांचे दि. ३० मार्च रोजी वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. दिवंगत देवराम महादेव कासारे यांचा जलदान विधी आणि पुण्यानुमोदन आदरांजली सभेचा कार्यक्रम शनिवार दि. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वा. मुकुंदराव आंबेडकरनगर धारावी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी खा. रामदास आठवले खा. राहुल शेवाळे बौध्दजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर, मा. आ. सुमंतराव गायकवाड, रिपाइंचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत कसबे आणि ईश्वर तायडे आदी उपस्थित राहाणार आहेत.

### हनुमान जयंती उत्सव व पालखी सोहळा

**मुंबई :** हनुमान जयंतीनिमित्त हनुमान मित्र मंडळ, चारकोप सेक्टर ७ तर्फे यंदाही ''हनुमान जयंती उत्सव व पालखी सोहळा' शनिवार, ४ एप्रिल रोजी प्रबोधनकार ठाकरेनगर, सेक्टर नं. ७, चारकोप, प्रियदर्शनी शाळेजवळ, कांदिवली (पश्चिम), येथे आयोजित केला आहे. या उत्सवात हनुमान मंदिरात जन्मकाळ, अभिषेक, होमहवन, सत्यनारायण महापूजा, पालखी सोहळा, महाआरती आणि भंडारा (महाप्रसाद) आयोजित करण्यात आला आहे. तसेच नृत्यस्पर्धा, क्रिकेट सामने स्पर्धा आणि लहान मुलांसाठी मैदानी खेळांच्या स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या आहेत. सर्व भक्तांनी तीर्थ प्रसादाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हनुमान मित्र मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# उद्योग करायला पैसे नाही तर वृत्ती लागते : हावरे

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) :** ''उद्योग करायला पैसे नाही तर वृत्ती लागते,'' असे प्रतिपादन उद्योजक सुरेश हावरे यांनी केले. परिवर्तन.... एक बदल, कर्तव्य फाऊंडेशन आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्तिक उपक्रमातून 'मी उद्योजक होणारच!' या उपक्रमाचे आयोजन षण्मुखानंद सभागृहात करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी उद्योजक विठ्ठल कामत, अशोक खाडे, मधुकर तळवळकर, रवींद्र प्रभुदेसाई, डॉ. मेधा मेहंदळे, गिरीष टिळक, अरुण दरेकर, कुंदन गुरव, राजेंद्र सावंत, राजेश अठावडे, प्रसाद लाड, अजित मराठे, पवन अगरवाल, विवेक मेहेत्रे, अतुल राजोळी, अजित बेडेकर, बिपीन पोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी महाराष्ट्रातील १८ यशस्वी उद्योजकांनी भाग घेतला होता. कोणतेही प्रोडक्ट बाजारात आणावे, त्याची जाहिरात कशी करावी, ते लोकांपर्यंत कसे पोहोचवावे याची माहिती भावी



उद्योजकांना दिली.

याप्रसंगी सुरेश हावरे म्हणाले की, ''नवीन उद्योजकाला अनुभवाचे कथन केलेच पाहिजे. या अनुभवामुळेच भावी उद्योजक पुढे येतील असे मला वाटते. उद्योग करायला पैसे लागत नाहीत. वृत्ती लागते. उद्योग करायला स्वत:चे पैसे लागत नाहीत तर दुसऱ्याचे पैसे लागतात. म्हणजे बँकांकडून मदत घेऊ शकता. संधी प्रत्येकाचे दार ठोठावते. ज्या गोष्टींना पैसा लागत नाहीत ती गोष्ट मराठी माणूस करीत नाही हा माझा आजपर्यंतचा अनुभव आहे; पण ज्या गोष्टीला पैसे लागत नाही, ती गोष्ट नेमकी इतर भाषीय उद्योजक करतात म्हणून ते पुढे आहेत.''

तसेच ते म्हणाले की, ''जेवढे मोठे आव्हान असेल तेवढी मोठी तयारी ठेवा. व्यवसाय हा उद्योजकाचा श्वास आहे. जे काय करायचे आहे त्याची पूर्ण खात्री करा. व खात्री झाल्यावर त्याची सुरुवात करा. भावी उद्योजकाने कोणता व्यवसाय करणे मनात ठरविणे गरजेचे आहे. कुठलाही व्यवसाय करताना बिनधास्त, बेधडक करा.'' या वेळी 'उद्योग तुमचा पैसा दुसऱ्यांचा' या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले.

# शिवसेना आणि एमआयएम हे जातीयवादी पक्ष!

## नारायण राणे यांचा प्रहार

**मुंबई, दि. ३ (हिं.स.) :** शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात चुरशीची मानली जाणारी वांद्रे पूर्व पोटनिवडणूक आता काही दिवसांवर येऊन ठेपलेली आहे. त्यामुळे आता या अनुषंगाने आरोप-प्रत्यारोपाच्या फैरीदेखील झडू लागल्या आहेत. ''शिवसेनेच्याच मदतीसाठी एमआयएमने उमेदवार दिला असून एमआयएम हे शिवसेना-भाजपाचेच पिल्लू आहे, ''असा आरोप काँग्रेस उमेदवार नारायण राणे यांनी केला आहे. ''मुळातच शिवसेना आणि एमआयएम हे जातीयवादी पक्ष आहेत.

त्यामुळे लोकहिताची काम



होणे त्यांच्याकडून शक्य नाही,'' असा प्रहार राणेंनी केली आहे. तसेच वांद्यात एमआयएमचा प्रभाव नसल्याचे राणेंनी म्हणणे आहे. नारायण राणेविरुद्ध शिवसेना असे चित्र या निवडणुकित पाहायला मिळते आहे. त्यातच एमआयएमनेही उमेदवार दिल्याने या निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. असे असले तरी आपल्याच पक्षाला मोठ्या प्रमाणात मतदान होणार, असा विश्वास एमआयएमचे आमदार वारिस पठाण यांनी व्यक्त केला आहे. शिवसेना आणि राणे दोन्ही येथील लोकांच्या समस्या समजू शकत नाही, असा आरोपही त्यांनी केला होता. त्यामुळे आता या निवडणुकीत दोघात तिसरा अशी लढत पाहायला मिळणार आहे.

# मेट्रो-३ विरोधात पाच हजार गिरगावकरांची मुख्यमंत्र्यांना पत्रे

## अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा!

**मुंबई, दि. ३ (हिं.स.) :** मेट्रो-३ प्रकल्पाविरोधात गिरगावकरांनी मोहीम सुरू केली आहे. येथील नागरिकांनी मुख्यमंत्र्यांना तब्बल पाच हजार पोस्टकार्ड स्वाक्षरीसहित पाठविली आहेत. तर दुसरीकडे सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेनेनेही गिरगावकरांच्या पुनर्वसनाच्या समस्यांकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी शिवसेनेने येथे बंदची हाकदेखील दिली होती. तेव्हा काँग्रेस आणि मनसेनेही पाठिंबा दिला होता. या पत्रांची दखल न घेतल्यास गिरगावकरांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झदरम्यान धावणाऱ्या मेट्रो-३ या प्रकल्पामुळे एकूण ७७७ कुटुंबांना स्थलांतरित करावे लागणार आहे. त्याला स्थानिकांचा विरोध आहे. मात्र या कुटुंबांचे विस्थापन



होणार नसून त्यांना त्याच परिसरात घरे मिळतील, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला होता. त्यामुळे आता यासंदर्भात सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेमकी काय भूमिका घेतात याकडे गिरगावकरांसह मुंबईतील जनतेचे लक्ष लागले आहे.

# मुंबई बँकेविरुद्धची तक्रार हे कारस्थान : दरेकर

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) :** ''मुंबई बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाविरुध्द मागील आठवड्यात माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात दाखल झालेली तक्रार ही बँकेच्या हितशत्रूंचे राजकीय कारस्थान आहे. बँकेच्या ५ मे रोजी होत असलेल्या निवडणुकींमध्ये विघ्न आणण्यासाठी रचण्यात आलेला कुभांड आहे. या अपप्रचाराविरोधात न्यायालयात दाद मागण्यात येईल,'' असे स्पष्ट प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी बुधवारी केले.

मागील आठवड्यात वकील विवेकानंद गुप्ता यांनी बँकेविरोधात तक्रार दाखल केली. ही तक्रार तसेच अपप्रचाराला थेट उत्तरे देण्यासाठी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर व ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेत दरेकर व नलावडे यांनी बँकेविषयीच्या एकजात सर्व आक्षेपांना सविस्तर, खुलासेवार उत्तरे दिली. ही तक्रार तसेच वृत्तपत्रातील अपप्रचार मोहीम, पोलीस तक्रारी व न्यायालयीन याचिका या



सगळ्यांमागे एकच कारस्थान आहे, तेच ते आरोप वेगवेगळ्या माध्यमातून करीत राहाण्यामागे बँक व संचालक मंडळ यांची बदनामी करण्याचाच या हितशत्रूंचा उद्देश आहे, हे दरेकर यांनी याबाबतचे पुरावेही दाखविले. तक्रारीमध्ये २०१२मधील एका प्रकरणात दरेकर व उपाध्यक्ष शिरवाडकर यांचा उल्लेख अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून करण्यात आला आहे. ''वास्तविक आम्ही दोघेही तेव्हा या पदांवर नव्हतोच, तरीही आम्हाला व्यक्तिश: करण्यासाठी हे कुभांड रचले गेले,'' असे दरेकर यांनी स्पष्ट केले. ''या अपप्रचार मोहिमेविरोधात आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत. तेथे आम्हाला न्याय नक्की मिळेल,'' असा विश्वासही दरेकर यांनी व्यक्त केला.

# 'मालवणी पोलिसांवर गुन्हा दाखल करा'

## पोलीस कोठडीतील संशयीताच्या मृत्युप्रकरणी आठवले यांची मागणी

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) :** ''मालवणी पोलीस ठाण्याच्या कोठडीत पारधी समाजाचे हरी चव्हाण यांच्या मृत्युप्रकरणी मालवणी पोलीस ठाण्यातील जबाबदार पोलिसांवर कलम ३०२प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करून या प्रकणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी,'' अशी मागणी रिपाइंचे अध्यक्ष खासदार रामदास आठवले यांनी केली आहे. आज दुपारी त्यांनी मालवणी पोलीस ठाण्याला भेट देऊन अतिरिक्त पोलीस आयुक्त तसेच सहाय्यक पो. आयुक्त राजपूत यांची भेट घेतली. मालवणी पोलीस ठाण्यावर पारधी समाजाने काढलेल्या मोर्चाला आठवलेंनी



संबोधित केले.

''पारधी हरी चव्हाण यांच्या मृत्युप्रकरणी जबाबदार पोलिसांना तत्काळ निलंबित करा, तसेच मयत हरी चव्हाणांच्या परिवाराला आर्थिक मदत देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची आपण भेट घेणार आहोत. याप्रकरणी त्वरित कारवाई व्हावी, यासाठी उद्या पोलीस आयुक्त राकेश मारियांची रिपाइं शिष्टमंडळ भेट घेईल,'' असे रामदास आठवले म्हणाले.

# बीसीसीआयच्या तांत्रिक समितीची ७ एप्रिलला बैठक!

**मुंबई, दि. ३, (हिं.स.) :** इंडियन प्रिमियर लीग उद्‌घाटन सोहळ्यापूर्वी बीसीसीआयच्या तांत्रिक समितीची बैठक माजी कर्णधार अनिल कुंबळेच्या अध्यक्षतेखाली ७ एप्रिलला कोलकत्याला होणार आहे. बीसीसीआयच्या एका सूत्रांनी सांगितले की, तांत्रिक समितीची बैठक ७ एप्रिल रोजी कोलकत्याला होणार आहे. बैठकीत १५ मार्चला दिल्लीमध्ये रणजी कर्णधार आणि प्रशिक्षकांच्या संमेलनात ठेवण्यात आलेल्या सल्ल्यावर विचार करण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त सैयद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेच्या कार्यक्रमावरदेखील चर्चा करण्यात येईल. एकदिवसीय संमेलनात रणजी संघाचे कर्णधार आणि प्रशिक्षकांनी घरगुती कार्यक्रमात बदल हवे असल्याचे सांगितले आहे. त्यांनी सल्ला दिला होता की, घरच्या टी-२० स्पर्धा आयपीएलच्या लिलावापूर्वी झाल्या



पाहिजेत. या सत्रात ही स्पर्धा ७ एप्रिलला संपेल आणि लगेच दुसऱ्या दिवशी आयपीएलदेखील सुरू होत आहे. अशातच आयपीएल फ्रेंचायजी संघ घरच्या मैदानावरील क्रिकेट खेळू शकत नाही. मुंबईला आपला रणजी कर्णधार आदित्य तारे, सूर्यकुमार यादव, अष्टपैलू खेळाडू अभिषेक नायक आणि युवा श्रेयर अय्यर आणि सरफराज खान यांच्या शिवायच खेळावे लागत आहे. बीसीसीआयने घरच्या खेळाडूंना उद्यापर्यंत टी-२० स्पर्धेत भाग घेण्यासाठी सांगण्यात आले आहे, ज्यानंतर ते आयपीएल संघात सामील होऊ शकतात.

# भा.गो.कुलकर्णी यांचे निधन

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) :** भाजपाचे अत्यंत निष्ठावान कार्यकर्ते असलेले भा.गो. कुलकर्णी यांचे ३० मार्च रोजी निधन झाले आहे. ते ८२ वर्षांचे होते, त्यांच्यामागे पत्नी दोन मुले, दोन मुली, दोन स्नुषा, दोन जावई, व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे पुत्र संतोष कुलकर्णी हे मुलुंड भागाचे बौद्धिक प्रमुख आहेत.



भा. गो. कुलकर्णी यांच्यावर गेले काही दिवस मुलुंड रूग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या अंत्यविधीस शेकडो भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, संघ स्वयंसेवक, संस्थांचे पदाधिकारी पंतनगर रहिवासातील अनेक नागरिक व मित्र वर्ग आप्तेष्ट उपस्थित होते. घाटकोपर पूर्वेस असणाऱ्या पंतनगर या गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीत १९६३ साली राहावयास आलेले होते. ते भारतीय जनता पार्टीचे सक्रीय निष्ठावान व असामान्य कार्यकर्ते म्हणून प्रसिध्द असल्यामुळे पक्षाची अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत; तसेच त्यांनी अनेक सभा आपल्या वक्तृत्वाने घाटकोपर येथे गाजविल्या. पक्षांच्या जन आंदोलनात ते सतत आघाडीवर असत आणि पक्षातर्फे त्यांनी १९७८ व १९८५ साली दोन वेळा मुंबई महानगरपालिका निवडणुकापण लढविल्या. दिल्ली सत्याग्रहात तर त्यांनी तुरूंगवासही भोगला आहे. असे हे सर्वाचे कनवाळू व कळकळीने नेतृत्व करणारे लोकांचे लोकनायक यभा.गो.ल म्हणून प्रसिध्द होते. ।। झाले बहु होतीलही बहु, परंतु या सम हा ।। असे म्हणावेसे वाटते.

# धारावीत ज्वेलर्सवर दरोडा, पाच लाख लंपास

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) :** धारावीत बंद दुकानाचे शटर तोडून लाखो रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने अज्ञात दरोडेखोरांनी लांबविले. धारावीतील मुस्लीमनगर येथील ९० फूट रस्त्यावर स्वास्तिक ज्वेलर्स या दुकानावर हा दरोडा पडला आहे. धारावीत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शीव कोळीवाड्यात राहाणारे स्वास्तिक ज्वेलर्सचे मालक विमल केसरलाल जैन आज सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले असताना दुकानाचे शटर तुटल्याचे त्याच्या लक्षात आले. दुकानाच्या शोकेसमधील सर्वच नवीन, जुने तसेच गहाण ठेवलेले दागिने चोरांनी लंपास केले होते. याबाबत त्यांनी शाहुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. शाहुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप काशिराम




माने यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. तसेच अज्ञात इसमाविरुध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला.

याबाबत विमल केसरलाल जैन म्हणाले की, ''दुकानातील सर्वच दागिने चोरांनी पळविले असून त्यामध्ये १६० ग्रॅम नवीन - जुने सोन्याचे दागिने तसेच सहा किलो चांदी असून तो एकूण ऐवज पाच लाख ६२ हजार रुपये किमतीचा आहे.''

तर शाहुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप काशिराम माने म्हणाले की, ''या दरोड्यात सराईत चोरांचा सहभाग असून, मध्यरात्री ही घटना घडली असण्याची शक्यता आहे. या प्रकरणी आम्ही फिंगर प्रिंट एक्सपर्टची मदत घेणार आहोत.'' धारावीत रात्रभर पोलिसांची गस्त असताना, राजरोसपणे चोरीच्या अनेक घटना घडत आहेत. आता रस्त्यावरील दुकानात दरोडा पडल्याने धारावीतील अन्य सोन्याच्या दुकान मालकात कमालीची भीती पसरली आहे.

**FAG**

**एफएजी बेयरिंग्स इंडिया लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालयः नरिमन भवन, ८वा मजला,
२२७, बैकबे रेकलेमेशन, नरिमन पोइंट, मुंबई - ४०००२१.
फोनः +९१-२२-६६८१ ४४४४, फॅक्सः +९१-२२-२२०२ ७०२२
वेबसाईटः www.schaeffler.co.in इ-मेलः raj.sarraf@schaeffler.com
सीआइएनः L29130MH1962PLC012340

**वार्षिक सर्व साधारण सभेसंदर्भात जाहीर नोटीस आणि इ-मतदाना बदल माहिती**

कंपनीचे कारभाराचा व्यवहार करणे आणि पाहणे कामी, कि ज्याची नोटीस स्पष्टीकरणा सोबत या पूर्वीच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १०२ अन्वये सर्व भागधारकांना पाठवलेली आहे, एफएजी बेयरिंग्स इंडिया लिमिटेड ची ५२ वी वार्षिक सर्व साधारण सभा शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता, १२ वा मजला, पद्मभूषण वसंतदादा पाटील सभागृह, साखर भवन, नरिमन पोइन्ट, मुंबई - ४०० ०२१, येथे घेतली जाणार आहे.

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १०८ जे कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि लिस्टिंग कराराचे मुदा क्रमांक ३५ ब, चे सोबत वाचण्यात यावे, चे अनुसार / प्रमाणे, जे सभासद, ज्यांची नावे 'सभासद नोंदपुस्तक' मध्ये दिनांक २० मार्च २०१५ पर्यंत म्हणजेच नोंद दिनांक (शेवटची तारीख), मध्ये नमूद असतील अशा सभासदांना त्यांची मते, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, म्हणजेच सेन्ट्रल डीपॉझीटरी सर्विसेस (इंडिया) लि. (CDSL) यांनी उपलब्ध करून दिलेल्या ई-मतदानाने, देण्याची सोय करण्यात आलेली आहे, या संबंधातील सर्व ठराव या नोटिशीत नमूद आहेत.

| | |
|---|---|
| नोटीस पाठवण्याची पूर्तता केल्याची तारीख | मार्च ३१, २०१५ |
| इलेक्ट्रोनिक पद्धतीने मतदान चालू होण्याची तारीख आणि वेळ | बुधवार, एप्रिल १५, २०१५ वेळ ९.०० सकाळ (भारतीय प्रमाण वेळे नुसार) |
| इलेक्ट्रोनिक पद्धतीने मतदान बंद होण्याची तारीख आणि वेळ | शुक्रवार, एप्रिल १७, २०१५ वेळ ६.०० संध्याकाळ (भारतीय प्रमाण वेळे नुसार) |
| ५२ व्या वार्षिक सर्व साधारण सभे संदर्भातील नोटीस कंपनी च्या वेब साईट वर आणि CDSL चे वेब साईट वर प्रदर्शित करण्यात आलेली आहे. | www.schaeffler.co.in<br>www.evotingindia.com |
| इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होणाऱ्या मतदाना संदर्भात काही तक्रारी असल्यास त्यासाठी जवाबदार अधिकार्याचे संपर्क तपशील | श्री. राज सर्राफ<br>इ-मेलः raj.sarraf@schaeffler.com<br>फोनः +९१-२६५-६६०२२०६ |

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होणारी मतदान यंत्रणा दिनांक एप्रिल १७, २०१५ रोजी संध्याकाळी ६.०० (भारतीय प्रमाण वेळे नुसार) वाजता बंद होईल आणि त्यानंतर म्हणजेच एप्रिल १७, २०१५ रोजी संध्याकाळी ६.०० नंतर कोणालाही इ-मतदान येणार नहि.

एफएजी बेयरिंग्स इंडिया लिमिटेड करिता

दिनांकः एप्रिल ४, २०१५
स्थळः मुंबई

**राज सर्राफ**
कंपनी सचिव

# आगामी २० वर्ष, देशात भाजपाचेच सरकार!

**(पान १ वरून)** असा टोला अमित शाह यांनी लगावला.

ते पुढे म्हणाले की, ''आता आगामी काळात होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी प्रयत्न करण्याबाबत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार प्रयत्न करावेत. भाजपा सत्तेतून बाहेर पडल्यावर तेथे जंगलराज सुरू झाला आहे,'' असेही शाह म्हणाले. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाचे नेते अरुण जेटली, सुषमा स्वराज, राजनाथ सिंह आदी प्रमुख नेते उपस्थित होते.

# २०५०पर्यंत भारतात सर्वाधिक मुस्लीम

**(पान १ वरून)** मागे टाकून हिंदूंची लोकसंख्या एकूण जागतिक लोकसंख्येच्या तुलनेत तिसऱ्या स्थानावर पोहोचेल.

मुस्लीम धर्मियांच्या लोकसंख्यावाढीचा वेग हा जगात सर्वाधिक असेल, तर भारतामध्ये हिंदूंची सर्वाधिक लोकसंख्या असेल. इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत भारतात मुस्लिमांची लोकसंख्या सर्वाधिक असेल. सध्या जगात ख्रिश्चनांची लोकसंख्या सर्वाधिक असून, इतर कोणत्याही मोठ्या धर्मापेक्षा मुस्लिमांची वाढ वेगाने होत आहे. मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा वेग असाच कायम राहिला, तर २०७०पर्यंत जगात मुस्लीम धर्मियांची संख्या सर्वाधिक असेल, असे स्पष्ट करताना अहवालात म्हटले आहे की, भारत २०५०पर्यंत मुस्लीम लोकसंख्येत इंडोनेशियाला मागे टाकेल. इंडोनेशियात सध्या ८७.२ टक्के मुस्लीम लोक राहातात, तर भारतात मुस्लीम लोकसंख्या सध्या सुमारे १५ टक्के आहे.

# घुमान संमेलनाने मराठी-पंजाबी ऐतिहासिक ऋणानुबंध दृढ!

**(पान १ वरून)** घेतलेले साहित्य संमेलन, यामुळे हे संमेलन पहिल्यापासूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरले. विशेष म्हणजे, अमृतसर जिल्ह्यातील सर्व अधिकारी यासाठी एकदिलाने मदत करताना दिसले. उद्घाटन समारंभात नितीन गडकरी काय बोलतात याविषयी विशेष कुतूहल होते. त्यांनी आपल्या खात्याच्या दृष्टीने मोठी अमृतसर-उन्नाव महामार्गाची घोषणा करून मराठी साहित्य आणि पंजाबी साहित्य संस्कृती यातील साम्यस्थळे सांगितली.

नामदेव हे राष्ट्रीय संत असल्याचे सांगून त्यांनी साहित्य, संत विचार यातून संस्कार मिळतात, असे स्पष्ट केले. भौतिक प्रगती बरोबरच संस्कार महत्त्वाचे असतात असेही ते म्हणाले, तर माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्रातील मुंबई व अन्य शहरातून मराठी टक्का कमी होत आहे. मराठी लोक आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालण्यात धन्यता मानत आहेत, असे सांगून तसेच उच्चशिक्षित मराठी लोक एकमेकांशी मराठीऐवजी परकीय भाषेत बोलतात अशी खंत व्यक्त केली. यावर काही उपाय करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांनी आपल्या भाषणात सर्वांवर कळस चढविला. ''संत नामदेव यांनी महाराष्ट्रात जन्म घेऊन पंजाबमध्ये आपले जीवनकार्य संपविले तर गुरु गोविंदसिंग यांनी पंजाबमध्ये जन्म घेऊन नांदेड येथे कार्याची सांगता केली, याचाच अर्थ या दोन संस्कृतीतील नाते अध्यात्मिक आहे,'' असे सांगून आपल्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नेहमीच मदत केली. आमच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या. नांदेड ते आनंदपूर महामार्ग करण्याची मागणी पूर्ण केली.

तसेच, माजी मंत्री शरद पवार यांनी पंजाब संपूर्ण देशाला अन्नधान्य पुरवितो म्हणून विविध मागण्या पूर्ण केल्या असे सांगून, या दोन नेत्यांची प्रशंसा केली. तसेच, गुरुनानकदेव विद्यापीठात आम्ही संत नामदेव अध्यासन सुरु करीत असून संमेलनाध्यक्ष सदानंद मोरे यांनी त्यासाठी अभ्यासू मराठी व्यक्ती सांगावी त्याचा सर्व खर्च आम्ही करू, असे सांगून मराठी साहित्य संमेलन घेऊन गुरु नामदेवांनीच माझ्याकडून ही सेवा करवून घेतली आहे. आमच्या सेवेत काही कमी पडले असेल तर महाराष्ट्रीय जनांनी क्षमा करावी, असे भावपूर्ण उद्गार काढून त्यांनी सर्व उपस्थितांची मने जिंकली.

**FAG**

## एफएजी बेयरिंग्स इंडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: नरिमन भवन, ८वा मजला,
२२७, बैकबे रेकलेमेशन, नरिमन पोइंट, मुंबई - ४०००२१.
फोन: +९१-२२-६६८१ ४४४४, फॅक्स: +९१-२२-२२०२ ७०२२
वेबसाईट: www.schaeffler.co.in इ-मेल: raj.sarraf@schaeffler.com
सीआइएन: L29130MH1962PLC012340

### सभासद नोंदपुस्तक आणि शेअर / भाग हस्तांतरण पुस्तक बंद करणे बाबतची जाहीर नोटिस

सर्व तमाम लोकांना या नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९१ आणि "Stock Exchange"(शेअर मार्केट) चे लिस्टिंग करारान्वये कंपनीचे "सभासद नोंदपुस्तक" आणि "शेअर हस्तांतरण पुस्तक" दिनांक १ एप्रिल २०१५ ते ६ एप्रिल २०१५, दोन्ही दिवस धरून, सन २०१४ चे लाभांशाचे हक्कदार ठरवणे कामी, बंद ठेवण्यात येणार आहे. दिनांक ३१ मार्च २०१५ रोजीचे कामकाज संपण्याचे वेळेस ज्या भागधारकांची / शेअर धारकांची नावे लाभांश सभासद नोंदपुस्तका मध्ये प्रतीत होतील अशाच भागधारकांना लाभांश अदा करण्यात येईल.

एफएजी बेयरिंग्स इंडिया लिमिटेड करिता

दिनांक: २२ मार्च २०१५
स्थळ: मुंबई

**राज सरॉफ**
कंपनी सचिव

---

**मे. उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई (परसेवा) यांचे कार्यालय**
**दि. बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रिडा मंदिर बिल्डींग, ४था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं. २६, वडाळा, मुंबई - ४०००३१

### जाहीर नोटीस

**मोगविरा को. ऑप. बँक लि.** ... **अर्जदार**

**नवाब बिल्डींग, ३२७, डॉ. डी.एन. रोड,**

**फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

**अनुक्रमांक १ ते २**

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला मिळणे साठी दाखल केलेल्या अर्जासोबत तुमचे म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसीद्वारे आपणांस एक शेवटची संधी देण्यात येत असुन **दिनांक ०६.०४.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता** आपण स्वतःवरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | जाब देणार क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लालजी कुंवरजी शाह | १६.१०.१४ | १८९५ | १ | १२४८७५ | ६.४.१५ |
| | चंद्रकांत कमलाकर पाटील | | /१४ | २ | | |
| | बारकु सातवाराव रनवीर | | | ३ | | |
| | शरद शामलाल गुप्ता | | | ४ | | |
| २ | मकसुद महेबुब अली शेख | १६.१०.१४ | १८९६ | १ | १४००६० | ६.४.१५ |
| | सिताराम केशवलाल पटेल | | /१४ | २ | | |
| | स्टॅनली विल्यम सिल्वेस्टर डिसिल्व्हा | | | ३ | | |
| | शरद शामलाल गुप्ता | | | ४ | | |

**ही नोटीस आज दिनांक १८/०३/२०१५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.**

शिक्का

**सही/-**
**(व्हि. डी. गावडे)**
**मे. उप निबंधक, सहकारी संस्था**
**महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा)**

---

# डोंबिवलीतील स्वागत यात्रेला सामाजिक बांधिलकीची किनार

**डोंबिवली, दि. २१ (प्रतिनिधी):** सकाळी साडे सहा वाजता पश्चिमेकडील भागशाळा मैदान येथून स्वागत यात्रेस प्रारंभ झाला. स्वागत यात्रेच्या अग्रभागी श्रीगणेशाची पालखी आणि त्यानंतर इतर शेकडो चित्ररथांची रांग लागली होती. ढोलपथक, लेझीम पथक, घोडेस्वार, दुचाकी महिला स्वार आणि त्यांच्यात तल्लीन झालेला युवावर्ग-महिलावर्ग यांचा सहभाग असणाऱ्या स्वागत यात्रेचा आनंद घेण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी केली होती. ब्राह्मण महासंघ डोंबिवलीने मुलगी वाचवा देश वाचवा संदेश देण्यासाठी



स्वाक्षरी मोहीम राबविली होती. प्रदूषण टाळा असा संदेश देणारी सायकल रॅली, क्षितिज संचलित गतिमंद मुलाच्या शाळेतील विद्यार्थी, मुकादम यांनी सौरऊर्जेवर चालणारी फनो मालवाहतूक गाडी, सायकल चालवा प्रदूषण टाळा असे संदेश स्वागतयात्रेमधून देण्यात आले होते. परिवहन सदस्य प्रल्हाद म्हात्रे, भाजपाचे शैलेश धात्रक, नगरसेविका मनिषा धात्रक तसेच इतर राजकिय पक्षांनी स्वागतयात्रेचे स्वागत करण्यासाठी भव्य व्यासपिठ उभारली होती आणि डोंबिवलीकरांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या जात होत्या. स्वागतयात्रेचे एक टोक भागशाळा तर दुसरे टोक इंदिरा चौक अशा लांबलचक रांगेत हजारोंच्या संख्येने डोंबिवलीकर सहभागी झाले होते.

---

# गुढीपाडव्याला मनसेचा नवा पायंडा

## कापड आणि तांब्याऐवजी पक्षाचा झेंडा आणि मडके लावून उभारली गुढी



**मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) :** धारावीतील शीव-वांद्रे महामार्गावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आज सकाळी बांधलेल्या अनेक गुढी रस्त्यावरील पादचाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होत्या. त्याचे कारण असे की, गुढीला आनंद आणि विजयाचे प्रतीक समजले जाते. मात्र, मनसे पक्षाची निशाणी असलेले ध्वज बांबूच्या टोकाला बांधून त्यावर मातीचे मडके लावून गुढी उभारली. त्यामुळे मनसेने मराठी परंपरेलाच छेद दिला असून, मनसेचे प्रेम फक्त निवडणुकीपुरतेच असते का? असा सवाल धारावीकर विचारत आहेत. गुढीपाडव्यानिमित्त बांबूच्या टोकाला रेशमी कापड, कडुनिंब, फुलांचा हार आणि साखरेच्या गाठीची माळ बांधून, त्यावर धातूचे भांडे अथवा तांब्या बसवून, तसेच गुढी पाटावर उभारून विधिवत पूजा केली जाते. मात्र स्वार्थापोटी आपल्या संस्कृती व परंपरेचा विसर मनसे कार्यकर्त्यांना पडलेला दिसतो. या घटनेवरून मराठीचा बाणा जपण्यासाठी परप्रांतियांच्या कारभाराची होळी करणारे मनसे कार्यकर्ते नवीन पायंडा पाडत तर नाहीत ना असे वाटते.

गुढीला रेशमी कापड, तसेच धातूच्या भांड्याऐवजी पक्षाचा ध्वजासोबत मातीचे मडके लावून, मराठी संस्कृतीवर घाला घातल्याचे दिसून आले. याबाबत रस्त्यावरील एका पादचाऱ्यास विचारले असता तो म्हणाला,''स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी आपली मराठमोळी परंपरा बासणात गुंडाळण्याचा त्यांचा घाट दिसतो. गुढीवर निशाणीचे ध्वज लावून यांना काय संदेश द्यायचा आहे! आपली मराठी संस्कृती परंपरा चालीरिती बदलण्याचा प्रयत्न कराल, तर ते तुमच्या अंगाशी येईल,'' असेही ते पुढे म्हणाले.

---

**Public Notice**

NOTICE is hereby given that 1) Shri. Nitin Jagannath Phirake, son of Shri. Jagannath Phirake and 2) Mrs. Dipali Nitin Phirake, wife of Shri. Nitin Jagannath Phirake, resident of Flat no. Shankheshwar Kiran CHS Ltd, Flat No. 701, 7th Floor, Building No. 2, Wayale Nagar, Kalyan (W), Taluka Kalyan, Dist Thane have agreed to sell the property mentioned in the schedule hereto to my client. All persons claiming an interest in the said property or any part thereof, by way of Sale, Gift, Lease, Inheritance, Exchange, Mortgage, Charge, Lien, Trust, Possession, Easement, Attachment or otherwise, howsoever are hereby required to make the same known to the undersigned, in writing, at his office at the address given below, within 15 days from the date hereof, failing which the said sale will be completed, without any reference to such claim and the same, if any, shall be considered as waived.

**SCHEDULE**

Flat No. B/104, on first floor, area admeasuring about 40.42 sq.Mtrs. (435 Sq.Ft.) Built up in "B" wing in the building known as PRANIT of Chandresh Galaxy Pranit Co-operative Housing Society and assessed by KDMC by property No. B08011975200 situated on the piece and parcel of land bearing situated at Mauje Gandhare, Tal. Kalyan, Dist. Thane within the limits of Kalyan Dombivli Municipal Corporation, Registration District Thane and Sub-Registration Dist. Kalyan

Place : Kalyan
Date : 19/03/2015
Address : Divya Rajlakshmi CHS Ltd
(Pote Apartment, Bldg No. 4) "A" Wing,
Flat No. 61, 2nd Floor, Tisgaon Road,
Kalyan (East) 421306
Mob : 9819192108, 9421573866

Sd/-
PRALHAD G. WASULE
Advocate

---

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम जनतेस या जांहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली रूमची मिळकत ही माझे अशिल श्री. सुभाष भागुसा गठडी यांनी श्री. लक्ष्मण रघुनाथ आखाडे, राहणार-पुणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर रूमच्या मिळकती बाबत कुणाचाही गहाण, दान, वारसा हक्क, कब्जा वहिवाट, खावटी, कुळ अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची लेखी हरकत उपलब्ध कागदपत्रासह खाली सही करणाऱ्या वकीलांकडे सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत नोंदवावी. जर सदर मुदतीत कोणत्याही हरकती न आल्यास आमचे अलि सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत म्हणुन सदर रूमबाबतचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील मौजे कल्याण येथील धनवे चाळ, दुर्गा नगर चाळीतील ठाणकर पाडा विभागातील खालील वर्णनाची निवासी रूमची मिळकत.

| मौजे | स. नं. | हि. नं. | रूम नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| कल्याण | ९७ | ३ | १ धनवे चाळ | १८० चौ.फुट (बिल्टअप) |

मालमत्ता क्र. सी ०२०००८८६७००, म्यु. घर. नं. १७१/६/१(१), आळी नं. ३६

कार्यालयीन पत्ता :- दुर्गा नगर समोर, गठडी भवन,
ठाणकर पाडा, कल्याण (प.) ता. कल्याण, जि. ठाणे
मो. नं. ८६५५६१५९०९

सही/-
अॅड. सोनाली एस. गठडी

---

## गारपीटग्रस्तांना एक एप्रिलपासून मदत

**नाशिक, दि.२१ (प्रतिनिधी):** वादळी पाऊस आणि गारपिटीचा तडाखा बसलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना येत्या एक एप्रिलपासून केंद्रीय मदतीचे वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री राधा मोहन सिंह यांनी आज शनिवारी येथे केली. राधामोहनसिंह यांनी शनिवारी राज्यातील गारपीटग्रस्त आणि अवकाळी पावसाचा तडाखा बसलेल्या क्षेत्रातील नुकसानीचा आढावा घेतला.

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या नोटीसीद्वारे जाहिर करण्यात येते की, खालील परिशिष्टातील मौजे-नागांव, ता. मुरबाड, जि. ठाणे येथील वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल यांनी मुळमालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, हक्क, गहाण, दान, करार, बक्षिस अगर पोटगी हक्क व अन्य इजमेंटरी हक्क अगर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर त्यासंबंधी कागदपत्रासह लेखी निवेदन सह सादर करावे तसे न केल्यास तुम्ही तुमचे सर्व हक्क, हितसंबंध सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल हे सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील, हे सर्वांना कळावे.

**खालील परिशिष्टांत वर्णन केलेली मिळकत मौजे नागांव, ता. मुरबाड, जि. ठाणे येथील जमिनीचे वर्णन येणेप्रमाणे**

| जमिन मालकाचे नाव | भू. क्र. | क्षेत्र. हे.आर.प्रति | पो.ख. हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|---|
| सौ. रेखा रमेश कुर्ले व इतर | १०८२ | १-०३-० | ०-१८-० | १=१७ |
| सौ. रेखा रमेश कुर्ले | १०८३ | ०-५१-० | ०-००-० | ०=७५ |

**पत्ता :-** मु. पो.तुळई, ता. मुरबाड,
जि. ठाणे. मो. ७५०७७७९९९९

सही/-
**अॅड. सचिन लक्ष्मण चौधरी**

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविणेत येते की, मौजे गोरसई, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स. नं. २९/४ पै क्षेत्र ०-३९-५ पो. ख. ०-०७-७ आकार ६-९४, स. नं. ५३/६अ क्षेत्र ०-१४-१ पो. ख. ०-०४-० आकार ०-२०, स. नं. ३/१६ क्षेत्र ०-०३-६ पो.ख. ०-००-५ आकार ०-५६ ही जमिन आमचे अशिल श्री. दत्तु गोपाळ घोटकर, रा. गोरसई, पो. वडपे, ता. भिवंडी, जि. ठाणे यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची असून सदर जमिनीबाबत मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) भिवंडी यांचे कोर्टात रे.मु. नं. २२६/२०१५ हा दावा डिक्लेरेशन व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला असुन सदर दावा प्रलंबित आहे.

तरी संबधित जमिनी विषयी कोणीही कोणत्याही प्रकारे बांधकाम, खरेदी -विक्री, दान, बक्षिसपत्र, विकसित करारनामा, भाडे करार, वारसा, मृत्यूपत्र, तसेच इतर कोणत्याही प्रकारे दस्तावेज अथवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये, सदर व्यवहार केल्यास त्यास आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी, कळावे.

ऑफिस : साईराज अपार्टमेंट,
कार्तीक झेरॉक्सच्या मागे, अशोक नगर
गेट जवळ, जकात नाका,
भिवंडी, जि. ठाणे.

सही/-
**अॅड. सुदर्धन के. पाटील**
**बि.ए.एल.एल.बी.**

---




---

**रविवार, दि. २२ मार्च २०१५**

### दिनविशेष

- श्री अक्कलकोट स्वामीमहाराज जयंती (अक्कलकोट, सोलापूर).
- श्री हरिहर महाराज (त्याडी) पुण्यतिथी (अमरावती).
- मुस्लीम जमादिलाखर मासारंभ.
- जागतिक जलसंपदा दिन.
- १९४९ माध्यमिक शालांत परीक्षांची सुरुवात.
- २००२ भारतीय महिलांनी क्रिकेटमध्ये परकीय भूमीवर पहिला कसोटी विजय मिळविला. अंजुम चोप्राच्या नेतृत्वाखालील संघाने दक्षिण आफ्रिकेला दहा गडी राखून पराभूत करून ऐतिहासिक कामगिरी बजावली.
- विलास मुत्तेमवार यांचा वाढदिवस.
- लेखिका नंदा सुर्वे यांचा वाढदिवस.
- अभिनेता हरीश याचा वाढदिवस.

### सामान्यज्ञान

- **भारतीय क्रिकेट टीम इंग्लंड दौऱ्यावर सर्वप्रथम केव्हा गेली?**
  १९११ साली प्रथमश्रेणी क्रिकेट सामन्यांसाठी
- **भारत विरुद्ध इंग्लंड पहिला सामना केव्हा खेळविण्यात आला?**
  १५-१८ डिसेंबर दरम्यान मुंबई येथे
- **कोणत्या वर्षी भारताने पहिली कसोटी मालिका जिंकली?**
  १९५२-५३ साली पाकिस्तान विरुद्ध
- **भारताने विदेशात पहिल्यांदा कोणाविरुद्ध मालिका जिंकली?**
  १९६८ साली न्यूझीलंड येथे

### सुविचार

**खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्याच्यासाठी नवीन काहीतरी शिकण्याची संधी असते.**

### आजचे पंचांग

**शालिवाहन शक १९३७, मन्मथनाम संवत्सर, चैत्र, शुक्ल पक्ष. भारतीय सौर चैत्र १ शके १९३७. द्वितीया-तृतीया, रविवार, चंद्रनक्षत्र : अश्विनी, योग : ऐंद्र, करण : तैतिल, सूर्योदय : ६.४३, सूर्यास्त : ६.४९, गौरी तृतीया, गौरी शंकराचा दोलोत्सव, मत्स्यजयंती, क्षयदिन वर्ज्य.**

### भविष्य

**मेष** : आनंदाची सतार छेडली जाईल.
**वृषभ** : दिवस आनंदात जाईल.
**मिथुन** : गूढशास्त्रात रुची वाटेल.
**कर्क** : मित्र-मैत्रिणींची मदत मिळेल.
**सिंह** : कार्याचा आलेख उंचावेल.
**कन्या** : दुधाच्या व्यावसायिकांना फायदेशीर.
**तुळ** : महिलांचे ऐकावे लागेल.
**वृश्चिक** : गृहिणी कार्यभार उचलतील.
**धनु** : रसायन उद्योगात यशदायी.
**मकर** : माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांना बढती मिळेल.
**कुंभ** : संततीबद्दल सुवार्ता समजेल.
**मीन** : पाण्याशी संबंधित व्यापार विस्तारेल.

---

# प्रभादेवीत हिंदू नववर्षाचे जोरदार स्वागत



**मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी):** माहीम-दादर विधानसभा क्षेत्रातर्फे प्रभादेवीत मराठी नववर्ष साजरे करण्यासाठी प्रभादेवीपासून दादरच्या शिवसेना भवनापर्यंत स्वागतयात्रा काढण्यात आली. या स्वागतयात्रेत युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर उपस्थित होते, तसेच धारावी, माहीम, दादर, प्रभादेवी येथील हजारो शिवसैनिकांनी भाग घेतला. चिमुरड्यांनी घातलेला संत महात्म्यांचा वेश स्वागतयात्रेचे विशेष आकर्षण होते. चिमुरड्यांचा वेश पाहून रस्त्यावरील पादचारी कुतुहलाने त्यांच्याकडे पहात होते. हिंदू नववर्ष स्वागतयात्रेत दुचाकी चालविणाऱ्या महिला, महिलांचे ढोलपथक रस्त्यावरील पादचाऱ्यांचे लक्ष वेधत होत्या.

या स्वागतयात्रेत सर्व जाती-धर्माचे,तसेच भाषा-पंथ संप्रदायांचे लोक आपल्या पारंपरिक वेशात सहभागी झाले होते.

---

### विक्रमांचाही विक्रम...

**(पान १ वरून)** आता नजाकत भरलेले शॉट्स पाहायलाच मिळत नाही. अझर-द्रविड स्टाईलचा खेळ दिवसागणिक लुप्त होत चाललाय. अगदी कोल्हापुरी थाटात सांगायचं झालं, तर ''दाम्या बघतोस काय हाण की...'' अशी क्रिकेटची अवस्था झालीय. ईश्वर या अशा क्रिकेटचं भलं करो...

---

**मुंबई तरुण भारत**
**अंकासाठी संपर्क**
**जितेंद्र सोनावणे**
**९५९४९६९६४९**

**निवेदन**

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.

---

## निंबाळकर यांची बिनविरोध निवड

**मुंबई, दि.२१(प्रतिनिधी):** विधान परिषदेच्या सभापतीपदासाठीची निवडणूक टाळण्यात सत्ताधारी भाजपाला अखेर यश आले आहे. या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस वगळता इतर तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राम राजे नाईक निंबाळकर यांची सभापतीपदी निवड झाली. सर्व घडामोडींची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी स्वत: पुढाकार घेऊन, सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधला आणि सभागृहाची परंपरा कायम राखण्याची विनंती केली. त्यानुसार काँग्रेस, शिवसेना व अपक्ष आमदारांनी मुख्यमंत्र्यांच्या विनंतीला मान देत आपापले उमेदवार मागे घेतले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राम राजे नाईक निंबाळकर यांची सभापतिपदी बिनविरोध निवड झाली.

## Heavy Engineering Corporation, Ranchi
### (A Govt. of India Enterprises)
### OPEN TENDER NOTICE

**TENDER FOR ERECTION & COMMISSIONING OF VARIOUS EOT CRANES AT BSP, Bhilai**

| | |
|---|---|
| Tender Enquiry No. & Date | : HMBP/CED/BSP-Crane/29A/15-1939, Dated : 18.03.2015 |
| Brief Scope of work | : Unloading, Storage, Transportation of items from store to erection site, Erection, Testing & Commissioning of 300 T (5 Nos) EOT Cranes in BOF and CCP of SMS-III (PACKAGE NO : 029A) AT BHILAI STEEL PLANT, SAIL (BHILAI) |
| Tender Document sale started | : 19.03.2015 |
| Tender Document sale Closed | : 08.04.2015 upto 5.00 PM |
| Last date of submission | : 08.04.2015 upto 5.00 PM |
| Tender opening date & time | : 09.04.2015 at 3.00 PM |
| EMD Fee | : Rs. 5,00,000.00 (In form of DD or Bank Guarantee) |
| Tender Fee (Non-refundable) | : Rs. 5000/- in the form of DD in favor of "Heavy Engineering Corporation Ltd.", payable at SBI, Hatia, Ranchi |

**Detail specifications of cranes can be viewed in the website of HEC**. The Tender documents can be downloaded from HEC's website **www.hecltd.com** and can be submitted along with the tender fee.

**Chandra Shekhar**
**Sr. DGM/CED**

**Contact no - 0651-2401200**
E-mail : **chandrashekhar@hecltd.com, shivrajmaher@hecltd.com**

**HEC BUILDS MACHINES THAT BUILD THE NATION**

## SOUTH EASTERN COALFIELDS LIMITED
### (A Subsidiary of Coal India Limited)
### " A Mini Ratna Company "

**E-TENDER NOTICE FOR ONLINE BIDDING (Domestic)**

